नि. फौ. ख. क्र.१९०/२०१९ निशाणी क्र.४४

**सरकार तर्फे साक्षीदार क्र.४ यांचा शपथेवर जबाब**
**मी सत्यप्रतिज्ञेवर कथन करते/करतो की,**

नाव — शरद शामसुंदर पांडे

वय — ४४ वर्षे

व्यवसाय — कनिष्ठ सुरक्षा अधिकारी, महानिर्मिती, कोराडी, जि. नागपूर

पत्ता — रा. ए ३०१, कॅपीटल होम्स, कोराडी रोड, नागपूर, ता. कामठी, जि. नागपूर

**सरकारतर्फे सरकारी वकिल श्रीमती फौजिया त. अ. सादिक यांचे मार्फत सरतपास सुरुः**

१. मी सन २०१३ ते २०२० या कालावधीमध्ये कनिष्ठ सुरक्षा अधिकारी म्हणून पारस औष्णीक विद्युत केंद्र येथे कार्यरत होतो. दि.१३.०७.२०१९ रोजी मी संध्याकाळी कर्तव्यावर हजर असताना संध्या. ७.३० वा. सुमारास सहा. अभियंता श्री. पंकज खोंड यांचा मला फोन आला व त्यांनी मला सांगितले की, ॲश डॅम परीसरात लगुन क्र.२ मध्ये चोरीचा प्रयत्न सुरु असल्याबाबत त्यांना पाईपलाईन गस्तीवर असलेल्या कर्मचाऱ्यांनी सांगितले होते, ती बाब त्यांनी मला सांगितली. त्यानुसार मी त्वरीत लगून क्र.२ च्या ठिकाणी पोहोचलो असता मला झाडीमधून २ इसम हे ॲश डॅमची लोखंडी पाईप एक्झॉ ब्लेडच्या सहाय्याने कापत असताना दिसून आले. मी त्या ठिकाणी सदर दोन इसमांस पकडण्याचा प्रयत्न केला असता सदर झाडीमुळे ते तेथून पळून गेले. त्या ठिकाणी सदर इसमांनी कापलेले ३ पाईपचे तुकडे, एक मोटरसायकल क्र.एमएच३०/व्ही./३२३७, व १ एक्झॉ ब्लेड (आरी) मिळून आले.

२. सदर घटनेची मी माझ्या वरीष्ठांना माहिती दिली. त्यानंतर सदर लगुन २ चे अधिकार क्षेत्रात असलेले अधिकारी पंकज खोंड यांना माहिती दिली, त्यानुसार त्यांनी पो.स्टे. बाळापूर येथे सदर २ इसमांच्या विरुध्द फिर्याद दाखल केली. त्यानंतर सदर दोन इसमांचे नाव सुरज सिरसाट व अजय वानखडे असल्याचे आम्हाला पोलीसांकडून समजले. मी आता पुन्हा सांगतो की, मिळून आलेल्या मोटरसायकलचा क्र. एमएच३०/व्ही./२५३७ असा होता. मी सदर इसमांना पाहिल्यास ओळखू शकतो. आरोपी क्र.१ व २ आज न्यायालयात उपस्थित नाहीत, त्याच्या ओळखीविषयी त्यांच्या वकीलांमार्फत कोणताही वाद उपस्थीत नसल्याचे सांगितले.

३.		सदर गुन्ह्यातील पाईपचे तुकडे मला दाखविल्यास मी ओळखू शकतो. आता मला आर्टीकल १ ते ४ कडील मुद्देमाल दाखविण्यात आला तो तोच असून मला घटनास्थळी मिळून आला होता.

सरतपास पूर्ण.

**<u>आरोपीतर्फे विधीज्ञ श्रीमती व्ही. एच. शेगोकार यांच्यामार्फत उलटतपासः</u>**

४.		हे म्हणणे खरे नाही की, ॲश डॅम येथे २४ तास सुरक्षा कर्मचारी कर्तव्यावर असतात. हे म्हणणे खरे आहे की, ॲश डॅमच्या कामावर मजूर नेहमी असतात. हे म्हणणे खरे आहे की, ॲश डॅम प्रकल्पाच्या आजूबाजूला लोकांची बागायती शेती आहे.

५.		मी माझा जबाब देताना पोलीसांना " मला झाडीमधून २ इसम हे ॲश डॅमची लोखंडी पाईप एक्झॉ ब्लेडच्या सहाय्याने कापत असताना दिसून आले, मी त्या ठिकाणी सदर <u>दोन इसमांस</u> पकडण्याचा प्रयत्न केला असता सदर <u>झाडीमुळे ते तेथून पळून गेले</u>'' हा मजकूर सांगितला होता. सदरचा मजकूर हा माझ्या बयानात का लिहीलेला नाही, याचे कारण मला सांगता येणार नाही.

६.		हे म्हणणे खरे आहे की, लोखंडी आरी दुकानामध्ये सहज मिळते. हे म्हणणे खरे नाही की, आर्टीकल कडील लोखंडी तुकडे भंगार दुकानामध्ये सहज मिळू शकतात. हे म्हणणे खरे नाही की, मी माझ्या सरतपासादरम्यान आरोपीविरुध्द कथन केलेल्या सर्व बाबी खोट्या सांगितलेल्या आहेत. हे म्हणणे खरे नाही की, आज रोजी न्यायालयात खोटी साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी आरोपींना कधीच पाहिलेले नाही.

उलटतपास पूर्ण.
फेरतपास नाही.

**दिनांकः– १३.०२.२०२६**

**श्रवणोत्तर निवेदन स्विकृत**

DAYANAND MARUTI WAGHMARE
Digitally signed by DAYANAND MARUTI WAGHMARE
Date: 2026.02.13 14:38:43 +0530

**(डी. एम. वाघमारे)**
**प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,**
**(न्यायालय क्र.२), बाळापूर.**

<u>प्रमाणपत्र</u>

मी अधिकथन करतो की, पी.डी.एफ. करुन अपलोड केलेल्या न्यायनिर्णय/आदेश/ पुरावा मधील शब्द नि शब्द हे मुळ न्यायनिर्णय/पुरावा/आदेशाप्रमाणे आहेत.

| | | |
|---|---|---|
| न्यायालयाचे नाव | :– | **श्री. डी. एम. वाघमारे,**<br>सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, व प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, बाळापूर. |
| लघुलेखकाचे नाव | :– | अजय एन. हांडे |
| घोषित दिनांक | :– | १३/०२/२०२६ |
| न्यायनिर्णय/ आदेश/ पुराव्यावर पिठासीन अधिकारी यांनी केलेल्या स्वाक्षरीचा दिनांक | :– | १३/०२/२०२६ |
| अपलोड केल्याचा दिनांक | :– | १३/०२/२०२६ |